महा मेट्रो

PUNE METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड*
(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

## *महा मेट्रोची पायलिंग रिंग काम करतांना उलटली*

पुणे ०५ : महा मेट्रो द्वारे निर्माणाधीन पिंपरी-चिंचवड रस्त्यावर सुरु असलेल्या मेट्रो रेल प्रकल्पाच्या निर्माण कार्य स्थळी नाशिक फाटा चौक, जे.आर.डी टाटा उड्डाणपूलाखाली आज दुपारी सुमारे २.१५ वाजताच्या सुमारास पायलिंग रिंगचे कार्य सुरु असतांना जमीन भूसभुशीत असल्यामुळे पायलिंग रिंग मशिन कोसळल्या गेली. सुमारे १२० टन वजन इतकी पायलिंग रिंग जे.आर.डी टाटा उड्डाणपूल येथे कार्य करीत होती जमीन भूसभुशीत झाल्याचा अंदाज न आल्यामुळे ही अनाधन घटना घडली. ज्यामुळे बरेच वेळ ट्राफिक ची गर्दी झाली व काही वेळे करता हा रस्ता सामान्य नागरिकांन करता बंद करण्यात आला होता.

या घटनेची माहिती मिळताच महा मेट्रोचे जलद कृती पथक घटना स्थळी पोहोचून ग्रेड सेप्रेटर येथून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक सर्विस रोड व भोसरी मार्गाने वळविली. पायलिंग रिंग चे वजन हे १२० टन असल्यामुळे साध्या हायड्रा क्रेन उचलणे हे शक्य नव्हते त्याकरता मेट्रो प्रशासनाला मेट्रोच्या दुसऱ्या कार्यस्थळवर २०० टन वजन इतकी क्रेन आणावी लागली व या क्रेनच्या साह्याने पायलिंग रिंग मशिन उभी करून ट्राफिक पूर्ववत करण्यात आले. महा मेट्रोच्या सेफ्टी विभाग द्वारे कार्यस्थळी वेळीवेळी पाहणी केल्या जात असून अश्या प्रकारच्या ठिकाणी लक्षपूर्वक पाहणी करण्यात येते. पायलिंग मशिन रिंगच्या ड्रायव्हरला अश्या प्रकारच्या मशिन वर काम करण्याचा ६ वर्षाहून जास्ती अनुभव असून तो प्रशिक्षित होता व महा मेट्रोच्या कार्यस्थळी गेल्या ६ महिन्यांपासून कार्यरत होता. आता पर्यंत त्याने १०० हून जास्ती पायलिंग रिंग चे कार्य केले आहे, मशीन चे वजन जास्ती असल्यामुळे व जमीनीचां समतोल बिघडला व जमीन भूसभुशीत झाल्यामुळे त्याला सुद्धा याचा अंदाजा आला नाही व ही घटना या ठिकाणी घडली. घटनास्थळी महा मेट्रो तर्फे,ट्राफिक वार्डन,क्यूआरटी तसेच पोलीस विभागा द्वारे या ठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला होता जेणेकरून नागरिकांना त्रास होऊ नये.

या घटनेची नोंद घेत महा मेट्रोने सबंधित कंत्राट दारावर दंड ठोकाऊन त्याच्या विरुद्ध कार्यवाही करण्याचे निर्देश सबंधित विभागाला दिले. या ठिकाणी कुठल्याही प्रकारची हानी व नुकसान झाले नसून महा मेट्रो द्वारे दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे.